# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.४/२०२६** **दिनांक ०२/०६/२०२६**

**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०२.०६.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/८०१/२०२६ दि.३०.०५.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०२.०६.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री. शिवाजी कचरे,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** दि.०५.०५.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.१७८** दि.०५.०५.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**(कार्यवाही-सभा कामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. संस्थानमार्फत सन २०२६-२७ या वर्षभरात साजरे करणेत येणारे श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव, श्री साईसच्चरीत पारायण, नाताळ व नविन वर्ष स्वागतासाठी तसेच पावसाळा या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी येणारे रक्कम रु.४८,२७,०००/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१७९/१** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

२. संस्थानचे प्रसादालय विभागासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी खाद्यतेल व किराणामाल ५ साहित्य खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.१७९/२** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३** संस्थानचे सर्व्हे नं.१२५ पै. मध्ये विकसीत करणेत आलेल्या वाहनतळाचे ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी महिला व पुरुष प्रसाधनगृहाचे बांधकाम करणेसाठी प्राप्त ई-निविदांपैकी निम्नतम निविदाधारक विराज विश्वनाथ उंडे, राहूरी, अहिल्यानगर यांची रु.२८,४१,६३६/- मात्रची ई-निविदा स्विकारून त्यांना कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.१८०** प्रस्ताव मंजुर.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४** श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे वास्तव्य अधिक सोयीचे होऊन येथे भक्तांचा ओघ वाढावा यासाठी आध्यात्मिक कॉरीडोर विकासीत करणे, रस्ते विकास व सुशोभीकरण कामांचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणेसाठी निविदापुर्व बैठकीत सल्लागार यांनी सुचविलेले सुधारणांबाबत शासनाचे mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचे Common Set of Deviations (CSD) चे सोबत जोडलेल्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१८१** प्रस्ताव मंजूर. तांत्रिक प्रस्तावांचे मुल्यमापन करण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी. यामध्ये तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्यांसोबत सहा.संचालक, नगररचना विभाग, श्रीरामपूर, अधिक्षक अभियंता, सार्व.बांधकाम मंडळ, अहिल्यानगर, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद, शिर्डी यांचा समावेश समितीमध्ये करण्यात यावा.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५** शिर्डी नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं.१२४ पैकी, १२५ पैकी, १२६ पैकी व सिटी सर्व्हे क्र.९४०,९४१,९४२ मधील संस्थान मालकीच्या क्षेत्राचे रेखांकन मंजुरीबाबत.

**निर्णय क्र.१८२** कायदेशीर सल्ला घेऊन फेर प्रस्ताव सादर करावा.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६** संस्थानचे साईनगर येथील कर्मचारी वसाहत इमारतींमधील खोल्यांना अंतर्गत रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.१८३** प्रस्ताव मंजुर. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्टॉगरुमचे बांधकाम व गुरुस्थान मंदिरासमोर तळघराचे छतावरील भागात सभामंडपाचे बांधकाम ही बांधकामे साईभक्त श्री.अजय गुलाटी,करनाल यांचेमार्फत देणगी स्वरुपात करुन घेणेसाठी मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१८४** प्रस्ताव मंजुर.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८ लाडू प्रसाद विभागाकडील जुने ड्रायफ्रुट कोल्ड स्टोअरेज बायबॅक करुन नवीन खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रु.१४,७०,०००/- मात्रचे खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८५ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.९ श्री साई प्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन व एक्झॉस्ट यंत्रणा बायबॅक करुन नवीन यंत्रणा बसविणेकामी निम्नतम दरधारक मे.आधुनिक पॉवरटेक प्रा.लि.गुरुग्राम, हरीयाणा यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१० श्री साई प्रसादालय किचन करीता नवीन RXD 850 स्टीम बॉयलर खरेदी करणेकामी अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८७ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.११ संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे CAMC करीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८८ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२ संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल येथील लिफ्ट मॉडीफिकेशन करणेकामी येणा-या खर्चास तसेच त्याकामी ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१८९ मॉडीफिकेशनचा खर्च नवीन लिफ्ट खरेदी करणेच्या खर्चाच्या जवळपास होत असल्याने शिंडलर, जॉन्सन, ओटीस, कोने या नामांकिंत कंपनीच्या नवीन लिफ्ट विहीत प्रक्रिया राबवुन खरेदी करण्यात याव्यात.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१३** **संस्थानचे सर्व परिसरात जमा होणा-या प्लास्टीक बॉटल क्रश करणेकरीता क्रशर मशीन खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१९०** **प्रती दिन ५०० किलो क्षमतेचे प्लास्टीक क्रशर मशिन खरेदी करणेबाबत फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा संस्थानचे विविध इमारतींवर आकाशातून पडणा-या विजेपासून संरक्षण होणेचे दृष्टीने संस्थानचे इमारतीवर अत्याधुनिक पध्दतीचे नविन लाईटींग अरेस्टर बसविणेकामी संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३६,४०,५६०/- (सर्व करांसहित) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१९१** **शिर्डी देवस्थान परिसरातील विद्यमान ३६ लाईटनिंग अरेस्टर्सच्या संपूर्ण बदलासाठी अंदाजित रक्कम रूपये ३६ लाख खर्च करण्यापूर्वी, प्रत्येक लाईटनिंग अरेस्टरची सद्यस्थिती, अर्थिंग रेझिस्टन्स चाचणीचे निष्कर्ष, बदल आवश्यक असण्याची कारणमीमांसा तसेच केवळ अर्थिंग सुधारणा किंवा आवश्यक घटकांच्या दुरुस्ती/बदलाद्वारे प्रणाली कार्यक्षम होऊ शकते काय ?, याबाबतचा सविस्तर तांत्रिक लेखापरीक्षण (Technical Audit) अहवाल प्राप्त करण्यात यावा. तसेच प्रस्तावित बदलाची आवश्यकता स्वतंत्र तांत्रिक तज्ज्ञ संस्था/यंत्रणेमार्फत पडताळून घ्यावी व दुरुस्ती विरुद्ध संपूर्ण बदल यांचे तुलनात्मक खर्च विश्लेषणासह फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१५** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकामी कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून संस्थानचे www.sai.org.in तसेच शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रक्कम रु.६८,०५,१४६/-मात्रचे (सर्व करांसहित) खर्चास तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो कार्यादेशातील मागील दराप्रमाणे पुरवठाधारक मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून सेवा-सुविधा सुरु ठेवणेकामी मुदतवाढ मिळणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१९२** **सादर केलेल्या प्रस्तावावरून असे दिसून येते की विद्यमान वार्षिक देखभाल करार (AMC) दिनांक 11.05.2026 रोजी संपुष्टात येणार असल्याची पूर्वकल्पना असूनही नवीन निविदा प्रक्रिया वेळेत सुरू करण्यात आलेली नाही. संस्थेच्या अखंड व सुरळीत कार्यासाठी तसेच वीजपुरवठ्याच्या आपत्कालीन गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध 23 डी.जी. सेट्सची नियमित देखभाल अत्यावश्यक आहे. त्यामुळे देखभाल सेवा खंडित होणे संस्थेच्या कामकाजाच्या दृष्टीने हितावह ठरणार नाही. विद्यमान सेवा प्रदात्याची कामगिरी समाधानकारक असल्याची, मूळ करारामध्ये मुदतवाढ देण्याची तरतूद असल्याची तसेच प्रस्तावित दर वाजवी असल्याबाबत विभागाने प्रमाणित केल्यामुळे केवळ अंतरिम व तात्पुरती व्यवस्था म्हणून नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा कमाल तीन महिन्यांच्या कालावधीसाठी (यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत) मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**त्याचबरोबर, नवीन निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करून निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत संबंधित विभागास निर्देश देण्यात यावेत.**

**तसेच निविदा प्रक्रिया यापुढे वेळेत सुरू न झाल्यास संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१६** **मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.१५/२०२० मधील होणा-या निर्णयास अधीन राहून सध्याचे सिक्युरीटी कंत्राटदार यांना दि.०१.०७.२०२६ ते दि.३१.१२.२०२६ पावेतो सहा महिने कालावधी करीता सध्याचे आहे, त्याच दरात मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.१९३** **तहकुब.** **(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा संस्थानमध्ये सलग १० वर्षा पासुन आऊटसोर्स/ठोक पध्दतीने ठेकेदारामार्फत कार्यरत कर्मचा-यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत.**

**निर्णय क्र.१९४** **यापूर्वी मा.तदर्थ समितीने सदर विषयाचा विचार करून आउटसोर्स कर्मचाऱ्यांना सरसकट वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव नामंजूर केला होता. तथापि, कर्मचाऱ्यांच्या कामगिरीच्या मूल्यमापनावर आधारित प्रोत्साहनपर (Incentive) योजना तयार करण्याबाबत विचार करण्यास सांगितले होते. त्यासाठी आवश्यक मूल्यमापन निकष तयार करून प्रस्ताव सादर करणे अपेक्षित होते. तथापि, विभागाने असे कोणतेही निकष तयार केलेले नाहीत व त्याऐवजी पुन्हा एकदा सरसकट वेतनवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे.**

याशिवाय, इन-सोर्स अथवा नियमित कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली आहे या कारणास्तव आउटसोर्स कर्मचाऱ्यांनाही त्याच धर्तीवर वेतनवाढ देणे उचित ठरत नाही. दोन्ही प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, सेवा अटी व वेतन संरचना या भिन्न कायदेशीर व करारात्मक व्यवस्थांद्वारे नियंत्रित केल्या जातात.

वरील बाबी विचारात घेता, आउटसोर्स कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नसल्याने तो नामंजूर करण्यात येत आहे. भविष्यात वेतन पुनर्निर्धारणाची आवश्यकता असल्यास, संबंधित आउटसोर्सिंग करारातील तरतुदी, निविदेच्या अटी, लागू कामगार कायदे व आर्थिक परिणाम यांचा सविस्तर अभ्यास करून कायदेशीरदृष्ट्या सुसंगत प्रस्ताव स्वतंत्रपणे सादर करावा.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** माहे एप्रिल-२०२५ ते मार्च-२०२६ अखेर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल/अकुशल व सुरक्षा कंत्राटी कामगारांचा प्रतिदिन व श्रमदिन संख्येची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.१९५** नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-कामगार विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** श्री साईबाबा संस्थानमधील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती व प्रसादालय विभागातील कायम, संस्थान कंत्राटी इनसोर्स, आऊसोर्स/ठोक पध्दतीने ठेकेदारामार्फत कार्यरत कर्मचा-यांना चहा व भोजन मोफत देणेबाबत.

**निर्णय क्र.१९६** भोजन प्रसाद व चहा शुल्क यापुढे कर्मचा-यांचे वेतनातुन कपात करण्यात येवू नये.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२०** लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर (इनसोर्स) यांचेमार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचेप्रमाणे आऊटसोर्स ठेकेदारांकडील कर्मचारी व त्यांचे कुटूंबीयांना मोफत वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

**निर्णय क्र.१९७** सर्व कर्मचा-यांचे वैद्यकीय उपचारासाठी प्रथम महात्मा फुले जन आरोग्य योजना, कर्मचारी विमा योजना यामध्ये त्यांचा वैद्यकीय उपचार करण्यात यावा, यामध्ये बसत नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने मोफत उपचार करण्यात यावेत.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२१** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये तदर्थ (Ad-hoc) पध्दतीने कार्यरत असणा-या ०९ सहा. शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता नवीन नेमणुका देणेबाबत.**

**निर्णय क्र.१९८** **सदर अध्यापकांना मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आलेले असून त्यांना नियमित कर्मचाऱ्यांचा दर्जा प्राप्त होत नाही. जीपीएफ कपात करण्याची तसेच सलग १२ महिन्यांची सेवा प्रदान करण्याची मागणी मान्य करणे उचित ठरणार नाही. कारण अशा सुविधा प्रदान केल्यास नियुक्तीच्या तात्पुरत्या व मानधनाधारित स्वरूपाशी विसंगत दावे भविष्यात निर्माण होण्याची शक्यता आहे.**

**अध्यापकांच्या कल्याणाच्या दृष्टीने मर्यादित प्रमाणात आठ नैमित्तिक रजा (Casual Leave) मंजूर करण्यात यावी. मात्र, अशा रजेची मंजुरी ही केवळ सवलत म्हणून देण्यात येत असून त्याद्वारे नियमित नियुक्ती, सेवासातत्य, कायमस्वरूपी दर्जा अथवा इतर कोणत्याही सेवा लाभांवर दावा करता येणार नाही, अशी स्पष्ट अट नमूद करून सदर सवलत देण्यात यावी.**

**सदर अध्यापकांना प्रतिमहा एकत्रित रुपये २५,०००/- मानधन देण्यात यावे.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) विभागासाठी मशिनरी खरेदीकामी पात्र पुरवठाधारकांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१९९** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) विभागासाठी टुल्स, इक्विपमेंट, इन्स्ट्रुमेंट साहित्य खरेदीकामी पात्र पुरवठाधारकांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२००** **प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता नविन अभ्यासक्रमानुसार प्रस्तावित सिम्युलेशन लॅब (अभासी कार्यशाळा) उभारणी करणेकामी आवश्यक पायाभुत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०१** **प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**विषय नं.२५** **NEET JEE Coaching Classes करीता मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील न्युनतम दरधारकाचे दर स्विकारुन त्याप्रमाणे कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२०२** केवळ संस्थेतील विद्यार्थ्यांनाच फी सवलतीचा लाभ देण्यात यावा. प्रस्ताव मंजूर.

**(कार्यवाही-श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६** **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील न्यूरो ओ.टी. विभागाकरीता ०२ नग Craniotome System with all Accessories हे Manman कंपनीचे एकलस्त्रोत (Monopoly) मटेरीयल खरेदीस व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०३** रुग्णालय विभागाने दोन क्रॅनिओटॉम प्रणाली (Craniotome System) व त्यासोबत आवश्यक ॲक्सेसरीज खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर केला असून संबंधित उपकरण हे मॅनमन इंडिया प्रा. लि. कंपनीचे पेटंट व एकाधिकार (Monopoly) उत्पादन असल्याने त्यास समतुल्य पर्यायी उत्पादन इतर कोणत्याही उत्पादकाकडे उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर दाव्याच्या समर्थनार्थ पेटंट हक्क, मालकी हक्क (Proprietary Rights), विशेष उत्पादन अधिकार (Exclusive Manufacturing Rights) अथवा अन्य उत्पादकांकडे समतुल्य उपकरण उपलब्ध नसल्याबाबतची कोणतीही कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेली नाहीत.

त्यामुळे संबंधित विभागास सदर उपकरणाबाबत सविस्तर बाजार सर्वेक्षण अहवाल, प्रॉप्रायटरी आर्टिकल प्रमाणपत्र (Proprietary Article Certificate), तसेच संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांचे तांत्रिक अभिप्राय सादर करावे. प्रस्तावित उपकरणामध्ये अशी कोणती वैशिष्ट्ये आहेत की जी इतर उत्पादकांच्या समतुल्य उपकरणांमध्ये उपलब्ध नाहीत, तसेच प्रत्यक्षात कोणताही तांत्रिकदृष्ट्या समतुल्य पर्याय उपलब्ध नाही, याबाबत स्पष्ट प्रमाणित माहिती प्राप्त झाल्यानंतरच एकमेव स्त्रोताकडून (Single Source Procurement) खरेदी करण्यात चा प्रस्ताव नियमानुसार विचारार्थ घेणे उचित राहील.

फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे वार्षिक छपाई व कार्यालयीन स्टेशनरी दरनिश्चिती (Rate Contract) खरेदीकामी निम्नत्तम दरधारकांस पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत छपाई व स्टेशनरी खरेदीकामी तातडीने कोटेशन मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.२०४** **प्रस्ताव मंजूर. सर्व स्टेशनरी एकदम प्राप्त न करता आवश्यकतेनुसार मागणी करुन प्राप्त करुन घ्यावी.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्या-टप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.२०५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९** **वैद्यकीय संचालक या पदाचा प्रभारी कार्यभार देणेबाबत.**

**निर्णय क्र.२०६** **वैद्यकीय संचालक हे पद पुर्णवेळ भरण्यासाठीचा प्रस्ताव शासनास जा.नं.एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/६९१/२०२६,दि.२०.०५.२०२६ रोजी पाठविण्यात आलेला आहे. सदरचे पद पुर्णवेळ भरेपर्यंत वैद्यकीय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्र.निवासी उप वैद्यकीय संचालक यांचेकडे पुढील आदेशापर्यंत देण्यात यावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३०** **श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील मेडीकल ऑफीसर (होमिओपॅथीक) हे पद व्हिजीटींग पध्दतीने भरणेबाबत.**

**निर्णय क्र.२०७** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३१** **रुग्णालये विभागातील कायम कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची (१०,२० व ३०) सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३२** **तज्ञ डॉक्टरांनी त्यांचे ओपीडीचे दिवशी सर्जरी व प्रोसिजर केल्याने त्यावरील प्रलंबीत ठेवलेला इंन्सेटीव्ह माहे जानेवारी व नोव्हेंबर-२०२५ या कालावधीतील रु.८६,३६,३८६/- संबधीत डॉक्टरांना अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०९** **संबंधीत तज्ञ डॉक्टर यांनी संस्थानने जी नियमावली ठरवून दिलेली आहे त्याप्रमाणे कामकाज न केल्याने त्यांना देय होणा-या प्रोत्साहन भत्त्यामधुन ५ टक्के रक्कम कपात करुन उर्वरीत प्रोत्साहन भत्ता त्यांना देण्यात यावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.४,९८,८३५/- मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२१०** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३४** **LIC कडून प्राप्त होणा-या निधीचा वापर करुन श्री साईबाबा रुग्णालयातील विद्यमान Casualty विभागाचे आधुनिक Modular Casualty Unit मध्ये रुपांतर करणेस प्रशासकीय मान्यता बाबत.**

**निर्णय क्र.२११** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३५** **श्री साईनाथ रुग्णालय विभागातील डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, कान, नाक, घसा सर्जन यांचे माहे सप्टेंबर २०२३ व ऑक्टोबर २०२३ चे वेतनातुन कपात केलेली रक्कम अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२१२** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३६** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२५ ते डिसेंबर-२०२५ मध्ये अंतर्रुग्ण व बाहयरुग्णांवर करण्यात आलेल्या रु.२२,४६,३१,७६९/- वैद्यकीय उपचाराची व त्यामध्ये देण्यात आलेल्या रु.१८,९३,५१,६३६/-सवलतीची लेखाविषयक नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२१३ नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३७ श्री साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी-२०२६ ते मार्च-२०२६ मध्ये अंतर्रुग्ण व बाहयरुग्णांवर करण्यात आलेल्या रु.७,७९,०१,१५५/- वैद्यकीय उपचाराची व त्यामध्ये देण्यात आलेल्या रु.६,९५,२८,६९४/- सवलतीची लेखाविषयक नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२१४ नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३८ श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने कॅन्सर डे केअर सेंटर विभाग सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२१५ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करण्यात यावा. मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.३९ श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थो रुग्णांना शस्त्रक्रियेकामी देण्यात येणा-या इम्प्लांटसबाबत.**

**निर्णय क्र.२१६ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४० श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२६ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२१७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४१ श्री साईबाबा महाविद्यालयाकरिता स्थायी प्राचार्य पद भरणेबाबत.**

**निर्णय क्र.२१८ प्रस्ताव मंजूर. विभागाचे अभिप्रायातील पान क्र.२३७ वरील अ.क्र.५ व ७ या कार्यवाहीस मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४२** **संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी व ठेकेदारामार्फत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षांचा शैक्षणिक शुल्क परताव्याच्या अतिरिक्त खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२१९** **प्रस्ताव मंजूर. यापुढे संस्थानचे शैक्षणिक संकुलाव्यतिरिक्त इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ देण्यात येवू नये.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४३** **श्री.रंजन केशव त्रिभुवन, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२२०** **प्रस्ताव मंजूर. श्री.रंजन केशव त्रिभुवन, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांना सक्तीची सेवा निवृत्ती देण्यात यावी.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४४** **श्री. हेमंत भानुदास शिरसाठ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२२१** **प्रस्ताव मंजूर. श्री. हेमंत भानुदास शिरसाठ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना सेवेतून बडतर्फ करण्यात यावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४५** **श्री.बाबासाहेब माणिकराव शिंदे, प्र.विद्युत पर्यवेक्षक, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.२२२** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४६** **अभासी (Virtual), श्री साईसच्चरित विश्वपारायण सोहळा-२०२६ साजरा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२२३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४७** **संस्थानचे मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त होत असलेली पदसंख्या विचारात घेता श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील दैनंदिन हाऊसकिंपीगसह स्वच्छतेची कामे यांत्रिकीकरणासह बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळासह करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२२४ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करण्यात यावा.**
**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/श्री साईबाबा भक्तनिवास /विधी विभाग)**

---

**विषय नं.४८** **श्रींचे द्वारकामाई मंदिरात निंबराचे वरील भागावर सोन्याचे "राम" अक्षर देणगीदाखल बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२२५ प्रस्ताव मंजूर.**
**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४९** **श्रींचे समाधी मंदिरातील दोनही दरवाज्यांवर सोन्याचे "ओम (ॐ)" अक्षरे देणगीदाखल बसविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२२६ प्रस्ताव मंजूर.**
**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.५०** **व्दारकामाई येथे श्रींचे फोटोचे शेजारी मुर्ती स्थापित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२७ प्रस्ताव मंजूर.**
**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.५१** **मोतीचुर लाडू प्रसादामध्ये बदाम व खाण्याचा कापूर (Edible Camphor) यांचा वापर सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२२८ अन्न व औषध प्रशासनाची मंजूरी घेऊन लाडू प्रसादामध्ये खाण्याचा कापुर वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे. लाडू प्रसादामध्ये बदाम या ड्रायफ्रुटचा वापर करण्यात येवू नये.**
**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.५२** **मे.शांताई कार्पोरेशन,पुणे यांचा ई-निविदेमधील बयाना रक्कम परत मिळणेबाबतचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२२९** **मे.शांताई कार्पोरेशन,पुणे यांचा अर्ज दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.५३** **श्री साई दैनंदिनी -२०२६ शिल्लक संख्येबाबत.**

**निर्णय क्र.२३०** **प्रस्ताव मंजूर. यापुढे दैनंदिनी व दिनदर्शिका यांची संभाव्य मागणी विचारात घेऊन छपाई करण्यात यावी.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.५४** **संस्थानचे मंदिर परिसरातील गेट नं.०४ येथील पादत्राणेगृह तसेच सुलभ शौचालय इमारतीत बॅग क्लोकरुमसाठी जागा वापरास परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२३१** **सोसायटीने विना परवानगीने जागा वापर सुरु केल्याने प्रथम ती जागा त्यांचेकडून खाली करुन घ्यावी. सोसायटीला आवश्यकता असल्यास रितसर अर्ज करुन मागणी करावी.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५५** **संस्थानचे मंदिर परिसरातील गेट नं.०४ येथील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम साठी वापरावयास दिलेल्या जागेवरच डिजीटल मोबाईल लॉकर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२३२** **प्रस्ताव नामंजूर. जागा संस्थानने ताबडतोब ताब्यात घ्यावी. सोसायटीला आवश्यकता असल्यास रितसर अर्ज करुन मागणी करावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५६** **महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित (महाटेक्स) मुंबई यांना त्यांचे उत्पादने विक्री करणेकामी शिर्डी बस स्टॅण्ड येथील लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या गाळेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२३३** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५७** **महाराष्ट्र राज्य कामगार विमा सेवा सोसायटीचा दवाखाना संस्थान परिसरात सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२३४ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५८** **सौ.एस.जयालक्ष्मी, रा हैद्राबाद यांचे मालकीचा भिरामलगुडा गांव,सरुरनगर महसुल मंडळ, जिल्हा- रंगा रेड्डी येथील सर्व्हे नंबर ३१ भूखंड क्रमांक २६ क्षेत्र २७१ यार्ड (अंदाजे २२५ चौमी) इतका निवासी भूखंड (मोकळी जागा) संस्थानने दान स्विकारणेबाबत.**

**निर्णय क्र.२३५ प्रस्ताव मंजूर. या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा तपशिल समितीसमोर ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.५९** **श्री. आनंदराव रुद्रया गुणापल्ली रा. कोऊर, आंधप्रदेश यांचे मालकीचे मौजे पिंपळवाडी ता.राहाता येथील गट नंबर ११३/३ पै.०२० आर क्षेत्र संस्थानला दान देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३६ प्रस्ताव मंजूर. या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा तपशिल समितीसमोर ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.६०** **माहे मार्च-२०२६ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२३७ नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.६१** **सन २०२६-२०२७ करीता वार्षिक स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२३८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.६२** **शिर्डी नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परीक्षण अहवाल नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२३९** **नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.६३** **साईभक्तांमार्फत online.sai.org.in या वेबसाईटव्दारे आरक्षित केलेल्या सुविधा रद्द केल्यास सुविधेच्या आरक्षणापोटी जमा झालेल्या रकमेपैकी ७५% रक्कम साईभक्तांना परत करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४०** **प्रस्ताव अंशत: मंजूर. साईभक्तांनी निवासासाठी केलेले आरक्षण दोन दिवस आगोदर रद्द केल्यास अनुषंगीक रकमेच्या ७५% रक्कम परत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्ताव अंशतः मंजूर**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई यांचे सन २०२६-२७ करीता तांदुळ पुरवठयाबाबत.**

**निर्णय क्र.२४१** **जो पर्यंत फेर ई-निविदेची कार्यवाही पुर्ण होत नाही. तो पर्यंत मागील वर्षीचा पुरवठा दाराकडून मागील वर्षीच्या मंजूर दराने सोना मसुरी तांदुळ खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई यांनी तांदुळाचा पुरवठा न केल्यामुळे त्यांची रु.२,५०,०००/-बयाणा रक्कम जप्त करण्यात यावी.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या माध्यमिक विभागातील रिक्त होणा-या जागेवर तदर्थ (Ad-hoc) पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात सहा.शिक्षक पदभरती करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**वरील निर्णय क्र.१७८ ते २४२ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.७.४५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(शिवाजी कचरे)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**